लातूर
भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले
सांज दैनिक : सोमवार – २१ ऑगस्ट २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १४१
पाने – ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

तलाठी भरती परीक्षा, लातुरात परीक्षार्थी आक्रमक

लातूर : राज्यभरात तलाठी भरती परीक्षा चालू आहे. लातूर येथील अंबाजोगाई रोडवर एक परीक्षा केंद्र आहे. सकाळी ७.३० वाजता परीक्षार्थ्यांना बोलावून १० वाजेपर्यंत परीक्षा केंद्रात सोडलेच नाही. तेंव्हा परीक्षार्थी आक्रमक झाले. त्यांनी रस्त्यावर येण्याचा प्रयत्न केला. दरम्यान १० वाजण्याच्या सुमारास या परीक्षार्थ्यांना परीक्षा केंद्रात सोडले.

येथील परीक्षा केंद्रावर सुमारे अडीचशे ते तीनशे परीक्षार्थी होते. त्या सर्वांना सकाळी साडेसात वाजता परीक्षा केंद्रावर येण्यास सांगितले होते. ९ वाजता प्रत्यक्ष परीक्षा चालू होणार होती. १० वाजले तरी परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जात नव्हता. तेंव्हा परीक्षार्थ्यांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. काही परीक्षार्थी रस्त्यावर येऊन वाहने अडविण्याचा प्रयत्न करीत होते. दरम्यान, पोलीस यंत्रणा तात्काळ घटनास्थळी पोहचली. त्यांनी विद्यार्थ्यांची समजूत घातली. राज्यभरात सर्व्हर डाऊन असल्याने परीक्षा केंद्रात परीक्षार्थ्यांना सोडले नाही असे सांगण्यात आले. १० वाजता परीक्षा केंद्रात सोडण्यास सुरूवात झाली.

तलाठी परीक्षेतील पेपर फुटीचा प्रकार, सर्व्हर डाऊन यामुळे परीक्षार्थ्यांना नाहक मानसीक त्रास होत आहे. या प्रकरणी शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून परीक्षेतील असे गैरप्रकार थांबवावेत, परीक्षा पद्धतीत सुधारणा करावी, अशी परीक्षार्थ्यांकडून मागणी करण्यात येत आहे.

राज्यात तलाठी भरतीसाठी परीक्षेतील सर्व्हरमधील तांत्रिक बिघाडामुळे परीक्षा उशिराने सुरू झालीय. त्यामुळे पुढील दोन सत्रातील परीक्षाही दीड तास उशिराने सुरू होतील, अशी माहिती जमाबंदी आयुक्त अनिल रायते यांनी दिलीय. दुपारी साडेबारा वाजता सुरू होणारी परीक्षा आता दोन वाजता सुरू होणार आहे. तशी सूचना सर्व परीक्षा केंद्रांबाहेर लावण्यात आलीय.

राज्यात तलाठी भरतीसाठी परीक्षा सुरू आहेत आणि या परीक्षेत आज सर्व्हरचं विघ्न उभं राहिलं होतं. सर्व्हरच्या तांत्रिक बिघाडामुळे परीक्षा वेळेवर सुरू झाल्या नाहीत. त्यामुळे राज्यातील नागपूरसह अकोला, छत्रपती संभाजीनगर, लातूर आदी अनेक परीक्षा केंद्रावर प्रचंड गोंधळ झाला. सकाळी ९ वाजता परीक्षा सुरू होणार होती मात्र, सर्व्हर डाऊन मुळे विद्यार्थ्यांना १० वाजता परीक्षा केंद्रात सोडण्यात आले त्यानंतर १०.३० वाजता परीक्षा सुरू झाली. पहिला पेपर उशीर झाल्याने दुपारचं वेळापत्रक कोलमडले आहे.

गेले चार दिवस राज्यात तलाठी पदासाठीची ऑनलाईन परीक्षा सुरू आहे.रोज परीक्षा ही तीन सत्रांमध्ये घेतली जाते. पहिले सत्र सकाळी ९ ते ११, दुसरे सत्र दुपारी १२.३० ते २.३० आणि तिसरे सत्र सायंकाळी ४.३० ते ६.३० या वेळेत होते. ऑनलाइन परीक्षेत बहुपर्यायी प्रश्नपत्रिका परीक्षार्थींना सोडवावी लागते. राज्यभरात १७ लाखापेक्षा जास्त परीक्षार्थी यंदा तलाठी पदासाठीच्या परीक्षेसाठी बसलेले आहे. त्यामुळे ही परीक्षा राज्यभरातील विविध केंद्रांवर अनेक दिवस घ्यावी लागत आहे.

आज सकाळी ऑनलाइन परीक्षेसाठीचा सर्व्हर डाऊन झाल्यामुळे पहिल्या सत्राची परीक्षा वेळेत सुरू झाली नाही. सकाळी ९. ४० वाजता जवळपास सर्व्हर सुरू झाल्याची माहिती आहे. सर्व परीक्षार्थी बसल्यानंतर मुंबईतून टीसीएसकडून सर्व संगणकांवर एकाच वेळी प्रश्नपत्रिका दिली जाते आणि तिथून दोन तास मोजले जातात नागपुरातील सर्व केंद्रांवर पहिल्या सत्रातील परीक्षार्थींना ज्या वेळेस त्यांचा पेपर सुरू होईल तेव्हापासून पूर्ण दोन तासाचा कालावधी दिला जाईल असे सांगितले गेले.

सकाळी परीक्षा केंद्रांवर मोठ्या संख्येने उमेदवार प्रवेश पत्र हातात घेऊन उभे होते पण त्यांना वर्गात प्रवेश दिला जात नव्हता. त्यामुळे उमेदवार संतप्त झालेत. या आधी नाशिकमध्ये तलाठी भरतीच्या परीक्षेत हायटेक कॉपीचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे यापुढे तरी तलाठी परीक्षा निर्विघ्नपणे पार पडतील, का, असा प्रश्न तलाठी पदाचे परीक्षार्थी विचारत आहेत. दरम्यान, आता सर्व्हर पूर्ववत झाला आहे.

श्रावण महिन्यास दि. १६ बुधवार पासून सुरुवात झाली. आज श्रावणातील पहिला सोमवार असल्याने लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर मंदिरात श्रावणाच्या पहिल्याच सोमवारी भाविक-भक्तांनी दर्शनासाठी पहाटे पासूनच रांगा लावल्या होत्या.
(फोटो प्रकाश कंकाळ, लातूर)

तलाठी परीक्षा घेणाऱ्या कंपनीवर कारवाई केली नाही तर सरकार विरोधात उभा राहू-बच्चू कडू

अमरावती : सर्व्हर डाऊनच्या नावाखाली आज राज्यभर तलाठी परीक्षा केंद्रावर गोंधळ निर्माण झाला. सदर परीक्षा घेणाऱ्या व परीक्षेत गोंधळ करणाऱ्या एजन्सी विरोधात सरकारने कडक पाऊल उचलले नाही तर आपण सरकारच्या विरोधात उभं राहू असा इशारा माजी मंत्री आ. बच्चू कडू यांनी दिला आहे.

आज सकाळी ९ वाजता तलाठी परीक्षा सुरू होणार होती. पण, सर्व्हर डाऊनच्या नावाखाली विद्यार्थ्यांना उशिरा म्हणजे १० वाजता परीक्षा केंद्रात सोडण्यात आले. साडेदहा वाजता परीक्षा सुरू झाली. यामुळे परीक्षार्थ्यांमध्ये मानसीक तणाव वाढला. सदर परीक्षा घेणाऱ्या व परीक्षेत गोंधळ करणाऱ्या कंपनी विरोधात कडक कारवाई केली पाहिजे. सरकारने मागेपुढे न पाहता या कंपनी विरोधात आक्रमक भूमिका घ्यावी, अन्यथा सरकारच्या विरोधात उभं राहू अशी भूमिका बच्चू कडू यांनी घेतली आहे. एमपीएससी, युपीएससी, तलाठी परीक्षा व इतर

कोणत्याही भरती परीक्षांसाठी सरकार वेगवेगळ्या एजन्सीज नेमते आहे. त्या एजन्सीज व्यवस्थीत काम करत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होते. एकूणच या तलाठी भरती परीक्षा संदर्भात आपण मुख्यमंत्र्यांची भेट घेवून याबाबतची नाराजी त्यांच्याकडे व्यक्त करणार असल्याचे म्हटले आहे.

गुप्तांगावर मारून मोबाईल हिसकावला

लातूर : विशाल जुगनू सुरवसे याच्या तोंडावर व गुप्तांगावर मारहाण करून त्याच्याकडील मोबाईल व रोख रक्कम काढून घेतल्याप्रकरणी प्रेमविलास जाधव रा. सिद्धार्थ सोसायटी, लातूर, सिद्धेश्वर बालाजी जाधव रा. संत गोरोबा सोसायटी, लातूर यांच्या विरोधात गांधी चौक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यांच्या मते....

▣ **पक्ष आणि सत्तेवर एकाच कुटुंबाचे वर्चस्व, यालाच घराणेशाही म्हणतात.**
– अमित शाह

अशा कुटुंबातून भाजपात आले तर त्याला काय म्हणायचे.

▣ **मासे खाल्ले की 'बाईमाणूस' चिकनी दिसायला लागतात.**
– आदिवासी विकास मंत्री डॉ. विजय गावीत

चिकनी, ऐश्वर्या, कोमल काया हे काय घेतल्यानंतर सुचते.

▣ **शरद पवार यांना स्वतःच्या ताकतीवर एकदाही राष्ट्रवादी पक्षाचा मुख्यमंत्री बनविता आला नाही.**
– दिलीप वळसे पाटील

पीए असलेले दिलीप वळसे पाटील आमदार, मंत्री, विधानसभा अध्यक्ष स्वतःच्या ताकतीवर झाले असे म्हणायचे का?

▣ **अजितदादांनी तिखट प्रश्न विचारताच मुख्यमंत्री खवळले, बैठकीत वाद होताच फडणवीस धावले.**
– एक बातमी

फडणवीस हेच सरकारात पडद्यामागचे मुख्य सूत्रधार आहेत. हे दोघांनी ओळखले असावे.

जामर बंद करा; भाजपाचे आंदोलन

शहरातील रस्त्यावर नागरिकांच्या वाहनांना जामर लावून मनमानी पद्धतीने वसुली केली जात आहे. हे प्रकार थांबवावेत अशा आशयाचे निवेदन आज भाजपाच्या वतीने देण्यात आले. शहर जिल्हा भाजपाचे जिल्हाध्यक्ष देवीदास काळे यांच्या नेतृत्वात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी महापालिका कार्यालयावर जाऊन आंदोलन केले. पालिकेच्या पायरीवर ठाण मांडले. त्यांनी आपल्या मागण्यासंदर्भातील निवेदन आयुक्तांना दिले. दोन दिवसात जामर बंद करावे, अन्यथा रस्त्यावर जामर लावणाऱ्या यंत्रणेला रस्त्यावर फिरू देणार नाही असा इशारा देण्यात आला. या आंदोलनात भाजपाचे अनेक पदाधिकारी, माजी नगरसेवक सहभागी होते.

शिशिर धारकर 'मातोश्री'वर

मुंबई : पेणचे माजी नगराध्यक्ष आणि पेण अर्बन बँक घोटाळा प्रकरणातील आरोपी शिशिर धारकर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात प्रवेश करणार आहेत. २५० गाड्यांचा ताफा घेऊन धारकर 'मातोश्री'वर दाखल झाले आहेत. पेण, सुधागड, रोहा विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी-कार्यकर्ते ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत.

शिशिर धारकर हे पेण अर्बन बँक घोटाळा प्रकरणात आरोपी होते. त्यांना ठाकरे गटात पक्ष प्रवेश दिला जात असल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. धारकर हे गेली अनेक वर्ष राजकारणापासून लांब होते. मात्र आता ते पदाधिकारी कार्यकर्त्यांसह ठाकरे गटात पक्ष प्रवेश करत आहेत.

शिशिर धारकर पेणचे माजी नगराध्यक्ष आहेत. धारकर हे पेण अर्बन बँक घोटाळा प्रकरणी मुख्य आरोपी होते. ५०० कोटी पेक्षा अधिक रकमेचा घोटाळा केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. पेण शहरात त्यांच्या विरोधात नागरिकांमध्ये असंतोष असल्याचं बोललं जातं. शिशिर धारकर यांनीच पैसे बुडवल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

गेल्या काही वर्षात धारकर राजकारणात सक्रिय नसल्याचे देखील बोलले जात आहे. याआधीही शिशिर यांनी उद्धव ठाकरे गटात प्रवेश करण्यासाठी दोन-तीन भेटी घेतल्याची चर्चा आहे मात्र प्रवेश होऊ शकला नव्हता.

शिशिर धारकर यांचे वडील आप्पासाहेब धारकर हे काँग्रेसच्या काळात राज्यमंत्री होते.

राहिलेले पैसे देतो म्हणून बोलावून मारहाण करून पैसे काढून घेतले

लातूर : लातूर येथील एका व्यापाऱ्यास तुमचे राहिलेले पैसे द्यायचे आहेत म्हणून बोलावून घेवून त्यास मारहाण करून त्याच्याच खिशातील २० हजार रूपये व घड्याळ काढून घेतल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विलीन कमलाकर बिराजदार, व्यवसाय-व्यापार यास दोघा जणांनी संगनमत करून फोनवरून तुझे राहिलेले पैसे देतो, लवकर ये असे म्हणून त्याला बोधी चौकात बोलावून घेतले. तो जवळ येताच त्यास लाथाबुक्क्या, काठीने मारहाण केली व त्याच्या खिशातील २० हजार रूपये रोख व मनगटी घड्याळ काढून घेवून जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी दोघा जणांविरूद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मित्राकडे झोपायला आले अन् त्याच्याच घरातील दागिने घेवून पसार झाले

लातूर : मंदिराचे बांधकाम करणाऱ्या (शिल्पकार) असलेल्या मित्राच्या घरी दोघेजन झोपण्यासाठी आले. सकाळी उठून जात असताना त्यांनी घरात मित्राच्या पत्नीच्या पर्समधील जुने वापरातील मंगळसूत्र, झुमके असा एकूण २६ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार स्वराज नगर पाखरसांगवी शिवार येथे घडला आहे.

मोहन भुजंग लांडग रा. नांदेड जिल्हा हे मंदिराचे बांधकाम करतात. ते स्वराज नगर येथे भाड्याने राहतात. त्यांच्याकडे नांदेड जिल्ह्यातील शेजगीर गोविंद गिरी व अक्रम अजीज शेख हे आले. ते रात्रीच्यावेळी लांडगे यांच्याकडेच मुक्कामाला थांबले. गावाकडील किंवा आपल्या जिल्ह्यातील दोघेजन घरी मुक्कामी आल्याचे पाहून लांडगे यांच्या पत्नी शेजारी नातेवाईकांकडे मुक्कामी गेली होती.

गिरी व शेख या मित्रांनी रात्री मुक्काम केल्यानंतर सकाळी उठून जात असताना स्वयंपाक घरातील मित्राच्या पत्नीच्या पर्समधील दागिने घेवून निघून गेले. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांत दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

लोकांचा नकाराधिकार हिरावून घेणे लोकशाहीसाठी घातक

'टू मच डेमोक्रॅसी' डॉक्यूमेंटरी चे दिग्दर्शक वरुण सुखराज यांचे मत

लातूर : मला हे नको आहे, असे म्हणण्याचा अधिकार लोकशाहीने आपल्याला दिला आहे. हा अधिकार कोणी हिरावून घेत असेल तर ते फार गंभीर आहे. बऱ्याचदा सरकार असे करते. पण जवळचे लोक जर असे मत व्यक्त करत असतील तर लोकशाहीसाठी ते अत्यंत घातक आहे, असे प्रतिपादन दिग्दर्शक वरूण सुखराज यांनी केले.

अभिजात फिल्म सोसायटी तर्फे १९ ऑगस्ट २०२३ रोजी श्रीकिशन सोमाणी शाळेच्या सभागृहात दिग्दर्शक वरूण सुखराज यांनी दिग्दर्शित केलेली 'टू मच डेमोक्रॅसी' ही डॉक्युमेंटरी दाखवण्यात आली. सन २०२१-२२ या कालावधीत दिल्लीच्या सीमेवर तीन कृषी कायद्याच्या विरोधात शेतकऱ्यांनी दीर्घ आंदोलन केले होते. यावर आधारित ही फिल्म आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर प्रेक्षकांच्या प्रश्नांना वरूण सुखराज यांनी वरील विचार व्यक्त केले.

अलीकडील काळात देशात दोन अभूतपूर्व अशी आंदोलने झाली. पहिले अण्णा हजारे यांचे आंदोलन व त्यानंतरचे शेतकरी आंदोलन. पहिल्याच्या तुलनेत शेतकऱ्यांच्या आंदोलनाला मुख्य प्रवाहातील माध्यमांनी खूप कमी प्रसिद्धी दिली. इतकेच नाही तर शेतकरी आंदोलकांना खलिस्तानवादी, देशद्रोही म्हटले गेले. या संदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना वरूण सुखराज म्हणाले की, केंद्र सरकारने केलेले तीन कृषी कायदे शेतकऱ्यांच्या फायद्याचे की तोट्याचे हा वादाचा मुद्दा असू शकतो. पण त्यांचे म्हणणेच न ऐकून घेता, त्यांना गोळ्या घाला म्हणणे कितपत योग्य आहे? काही लोकांनी आंदोलनांवर प्रतिक्रिया व्यक्त करताना इतक्या टोकाची भूमिका कशी काय घेतली?

आंदोलनाला बाहेरून निधी पुरवठा होतो असा आरोप केला गेला. तो पूर्णपणे चुकीचा होता, असे त्यांनी उत्तरात सांगितले. प्रारंभी वरूण सुखराज यांचे स्वागत 'अभिजात' चे अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी केले तर सचिव शाम जैन यांनी त्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती गोवंडे यांनी केले व प्रा. ज्ञानेश्वर चौधरी यांनी आभार व्यक्त केले.

डॉक्युमेंटरीच्या प्रदर्शनानंतर झालेल्या चर्चेत शेषराव मोहिते, शिवाजी शिंदे व इतरांनी भाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजात चे धनंजय कुलकर्णी, डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख, अभिषेक बुचके, आदित्य कुलकर्णी, प्रणाली कोल्हे व देवयानी बागल आदींनी प्रयत्न केले.

चंद्रावरील अंतराळवीरांची कशी असते लाईफस्टाईल, जाणून घ्या खाण्यापासून झोपेपर्यंत सर्व काही

अंतराळ क्षेत्रात भारत आपली नांगी वाजवत आहे. चांद्रयान ३ आपल्या मिशनच्या अगदी जवळ पोहोचले आहे. त्याच वेळी, रशियाच्या लुना २५ मोहिमेचा उतरण्यापूर्वीच अंतराळात अपघात झाला. सध्या जेव्हा जेव्हा अंतराळात जाण्याची चर्चा होते, तेव्हा आपल्या मनात चांदीचे किंवा पांढरे कपडे घातलेले लोक फिरतात, ज्यांना अंतराळवीर म्हणतात. पृथ्वीवर आपण सर्वत्र ऑक्सिजनच्या कवचात राहतो, अंतराळात असे घडत नाही. अंतराळात शून्य गुरुत्वाकर्षण आहे, त्यामुळे अंतराळवीर जमिनीवर पाय ठेवू शकत नाहीत. ते फक्त हवेत तरंगत राहतात. लोकांना अंतराळात जाण्यासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाते आणि अंतराळवीरांची दिनचर्या खाण्यापासून तिथल्या वातावरणात राहण्यापर्यंत पूर्णपणे वेगळी असते.

अवकाशात काम करताना अंतराळवीरांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. ब्रह्मांडात असलेल्या रेडिएशनचा आरोग्यावर

वाईट परिणाम होतो, त्यामुळे शरीर कमजोर होऊ लागते. अंतराळात टिकून राहणे सोपे नाही. त्यामुळेच अवकाशात राहून संशोधन करणाऱ्यांचे खाण्यापासून ते झोपेपर्यंतचे संपूर्ण वेळापत्रक वेगळे असते. कसे ते सविस्तर जाणून घेऊया.

पूर्वीच्या तुलनेत आता तंत्रज्ञान खूप पुढे गेले आहे. अंतराळवीर पृथ्वीसारखे अन्न खात नाहीत, परंतु त्यांच्याकडे थर्मो-स्थिर अन्न असते. हे कमी आर्द्रतेचे अन्न असते. त्याच वेळी, पिण्यासाठी मुख्यतः विशेष पावडर वापरली जाते. जरी काही अन्न नैसर्गिकरित्या खाल्ले जाते जसे काजू इ. अंतराळात राहताना मर्यादित प्रमाणातच अन्न खाल्ले जाते. आता अंतराळात गुरुत्वाकर्षण नसल्यामुळे पृष्ठभागावर विश्रांती घेत नाहीत. जेव्हा संशोधकांना रॉकेटमधून बाहेर पडून काही काम करावे लागते, तेव्हा ते स्पेस सूट घालतात आणि सुरक्षा वैशिष्ट्यांद्वारे बांधलेले काम करतात. त्याच वेळी, एक लहान प्रोप्युलिझम सिस्टम, सेफर, अंतराळवीरांच्या सूटमध्ये स्पेस वॉकसाठी बसविली जाते, जी एक प्रकारचे लाइफजॅकेट म्हणून काम करते. हा सूट परिधान करून, अंतराळवीर कोणत्याही दोरीशिवाय अंतराळात फिरू शकतात. प्रश्न असा पडतो की अंतराळात शून्य गुरुत्वाकर्षण आहे, मग अंतराळवीर मलमूत्र कसे उत्सर्जित करतात. आम्ही तुम्हाला सांगतो की ते अगदी सामान्य टॉयलेटसारखे आहेत, परंतु त्यात उच्च व्हॅक्यूम क्लीनर बसवलेले आहेत, जे सर्व कचरा वेगाने खेचतात.

हिंडेनबर्गचा कहर संपला, अदानींनी ३ महिन्यांत केली १३ हजार कोटींची कमाई

हिंडेनबर्ग संशोधनाचा अहवाल येऊन जवळपास ८ महिने झाले आहेत आणि त्याचा परिणामही हळूहळू दिसून येत आहे. याचा अंदाज तुम्ही यावरून लावू शकता की जून तिमाहीत समूहाने ७० टक्के नफा कमावला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बंदर, वीज आणि हरित ऊर्जा या व्यवसायात या तीन महिन्यांत खूप चांगली कामगिरी दिसून आली आहे. यामुळे सर्व कंपन्यांचा संयुक्त नफा ७०% आणि त्याहून अधिक झाला आहे. तसे, या तिमाहीत विक्रीत घट झाली आहे. तुलनात्मक कामगिरीबद्दल बोलायचे झाल्यास, FY2023 च्या पहिल्या तिमाहीनंतर संपादन केलेल्या सिमेंट व्यवसायाचा समावेश केलेला नाही.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, गौतम अदानी समूहाच्या एकत्रित नफ्यात १२,८५४ कोटी रुपयांची वाढ झाली आहे, तर व्याज, कर, घसारापूर्वीची



कमाई सुमारे ४२ टक्क्यांनी वाढून २०,९८० कोटी रुपये झाली आहे. तुलनात्मक संचामध्ये समाविष्ट असलेल्या कंपन्यांची विक्री सुमारे ६९,९११ कोटी रुपये होती. तुलनात्मक कमाईमध्ये अदानी पोर्ट आणि स्पेशल इकॉनॉमिक झोन, अदानी पॉवर, अदानी ग्रीन एनर्जी, अदानी विल्मार, अदानी टोटल गॅस, अदानी एंटरप्रायझेस आणि अदानी ट्रान्समिशन यांचा समावेश आहे. एसीसी आणि अंबुजा सिमेंट यांचा समावेश करण्यात आला नाही कारण त्यांचे विलीनीकरण गेल्या वर्षी सप्टेंबरमध्येच पूर्ण झाले होते.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, जून तिमाहीत, अदानी एंटरप्रायझेसने समूह कंपन्यांमध्ये सर्वाधिक महसूल दिसला, अदानी पॉवरचा नफा वर्ष-दर-वर्ष ८३ टक्क्यांच्या वाढीसह सर्वाधिक होता. अदानी पोर्ट्स, अदानी ट्रान्समिशन आणि अदानी ग्रीन एनर्जीसह अदानी पॉवर कीसेल्समध्ये वार्षिक आधारावर दुहेरी अंकी वाढ झाली. तर अदानी ग्रीनची विक्री सर्वाधिक दिसून आली.

दरम्यान, अदानी एंटरप्रायझेस आणि अदानी विल्मर या दोनच कंपन्यांच्या उत्पन्नात कोळसा आणि खाद्यतेलाच्या किमतीत घट झाल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात घट झाली आहे. जिथे अदानी एंटरप्रायझेसने विक्रीतील कमजोरीनंतरही नफा वाढवला. तर अदानी विल्मार तोट्यात राहिला. समूहाच्या मुख्य व्यवसायांपैकी एक असलेल्या अदानी पोर्ट्सने या तिमाहीत उच्च मालवाहतूक, ऑपरेटिंग नफा आणि सर्व समूह कंपन्यांमधील विक्रमी विक्रीसह आघाडी घेतली. या कालावधीत कंपनीने कार्गो मार्केट शेअरमध्ये २ टक्के वाढ नोंदवली.

या वर्षाच्या सुरुवातीला हिंडेनबर्ग या अमेरिकन संशोधन कंपनीने अदानी समूहाविरुद्ध अकाउंटिंग फसवणुकीचा आरोप केला होता. अदानी समूह सातत्याने हे आरोप फेटाळत आहे. या आरोपांचा समूहावर गंभीर परिणाम झाला, समभागांची घसरण झाली आणि एका क्षणी कंपन्यांचे बाजार मूल्य १५३ अब्ज पेक्षा जास्त कमी झाले. या आरोपांनंतर समूहाचे बहुतांश शेअर्स खालच्या पातळीवर होते. सध्या, समूहातील सर्व कंपन्या सावरल्या आहेत आणि अदानी पोर्ट्स, अदानी पॉवर, अदानी ग्रीन एनर्जी आणि अदानी एंटरप्रायझेसचे शेअर्स खालच्या पातळीपासून दुप्पट झाले आहेत. तथापि, बहुतेक कंपन्यांच्या शेअर्सच्या किमती अद्याप अहवाल येण्यापूर्वीच्या पातळीवर पोहोचलेल्या नाहीत. गेल्या आठवड्यात, ऑडिटर डेलॉइट हॅस्किन्स अँड सेल्स एलएलपीच्या राजीनाम्यानंतर अदानी पोर्ट्सच्या समभागांना धक्का बसला, परंतु यूएस-आधारित त्रस्त्रइन्व्हेस्टमेंट्सने अदानी पॉवरमध्ये १ बिलियन पेक्षा जास्त भागभांडवल विकत घेतले, ज्यामुळे समूहाचे शेअर्स वाढण्यास मदत झाली.

शेतकऱ्यांचा पालनहार (संरक्षक) नागदेवता!

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील अत्यंत महत्वाचा सण आहे. यादिवशी घरोघरी नागाची पूजा करून नाग देवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे. नागाच्या मंदिरावर रोषनाई केली जाते, रात्रीपासुन पुजा-अर्चना केली जाते तर कुणाच्या मनसुबाचे निवारण केले जाते. पचमढी येथे नागद्वारला भव्य अशी यात्रा भरवली जाते. जी मध्यप्रदेशच्या नियंत्रणात येते. त्या दिवशी उपासक बाहेरचं साधं पाणी सुध्दा पीत नाही, इतके बारकावे पाळले जातात. उपवास सोडते वेळी कढई केली जाते, जी सर्वांना निमंत्रीतांना दिल्यानंतर उपवास सोडला जातो. इतका जटील उपवास असतो, जो ज्याला जमतो त्यालाच जमतो. सर्वसाधारण माणसं करुच शकत नाही, काटेकोरपणे पालन केले जाते. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्यादिवसा पासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते. दर बारावर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथसंप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या-गौतमी) संगमावर स्नान करतात.

एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे आणि तो वास्तववादी आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियमाचे पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध-लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात व आमचे संरक्षण कर अशी प्रार्थना करतात. अनंत (म्हणजेच शेष), वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या ८ नागांची या दिवशी पूजा केली जाते. मात्र खालील श्लोकात वासुकी, तक्षक, कालिय, मणिभद्रक, ऐरावत, धृतराष्ट्र, कार्कोटक आणि धनंजय, असे वेगळेच नाग सांगितले आहेत.

वासुकिः तक्षकश्चैव कालियो मणि भद्रकः।
ऐरावतो धृतराष्ट्रः कार्कोटक धनञ्जयौ।।

भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारे नागांची पूजा केली जाते. नाग म्हणजे फणाधारी सर्प. याच्या फणेवर पुढच्या बाजूने दहाच्या अंका सारखे चिन्ह असते. नागाचा रंग हिरवट किंवा पिवळा असतो. त्याच्या तोंडात विष धारण करणारे दात असतात. नागाचीजीभदुभंगलेलीअसते. प्राचीन भारतीय लोकांनी त्याला देवत्व देऊन त्याला पूजा विषय बनवले. कृषी संस्कृतीत नागाच्या पूजनाचे महत्त्व विशेषआहे. नाग आणि साप हे शेताचे रक्षणकर्ते आणि शेतकरी बांधवांचा मित्र मानला जातो. या सणाच्या निमित्ताने विवाहित बहिणीला तिचा भाऊ माहेरी घेऊन येतो अशी पद्धत भारतात रूढ आहे. नागपंचमीला स्त्रिया व मुली झाडाला दोरे बांधून गाणे म्हणत झोके घेतात. पूजेला जाण्यासाठी हाताला मेंदी लावण्याची पद्धतही हौसेचा भाग म्हणून आलेली दिसते.

पूर्वी नागपंचमीच्या सणापूर्वी ८ ते १० दिवस आधी गल्लीतील सर्व लहान थोर स्त्रिया एकत्र येऊन फेर धरून गाणी म्हणायच्या. झिम्मा-फुगडी, घोडा-चुईफुई, पिंगा-काटवटकाना, पिंगा इत्यादी खेळ मनसोक्त खेळायच्या. खेळता-खेळता उखाणे, गाणी म्हणून मनमोकळं करायच्या. आजही पध्दत ग्रामीण भागात जास्त प्रचलित आहे. त्यामुळे नागपंचमीला जास्त महत्व दिल्या जाते. दहन घाटावरती रात्रभर भजने होत असतात. या दिवशी महिला वर्तुळाकारआकार तयार करूनझिम्मा-फुगडी साखी नृत्ये व खेळ खेळतात. नारळ आणि लिंबू यांच्या या दिवशी शर्थी लावल्या जातात. म्हणजे विशिष्ट अंतरावर नारळे ठेवून त्यांच्या पलिकडे फेकण्याची शर्थ फार जुनी परंपरा आहे.

यादिवशी महिला घराची स्वच्छता करतात. जमिनी शेणाने सारवितात. अंगणात रांगोळी काढतात. नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात. भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते दूध-लाह्याह्या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. पावसाळयात तो माणसाच्या हिताचा आहार आहे. नागाच्या मंदिरात त्या दिवशी बाऱ्या सामुहिकरित्या म्हटल्या जातात. त्यामुळे एखाद्याला दंश झाला की त्या बाऱ्या म्हटल्याने विश सहज उतरते आणि जीव वाचला जातो.

सांगली जिल्हाच्या पश्चिमेला असलेला बत्तीस शिराळा हा तालुका नागपंचमीच्या उत्सवासाठी प्रसिद्ध होते. पुणे-बेंगलोर महामार्गावर कोल्हापूरकडे जाताना, पेठनाका (इस्लामपूर) पासून उजव्या बाजूला एकफाटा



फुटतो. तेथून साधारण २० कि.मी वर बत्तीस शिराळा वसलेले आहे. सांगली जिल्हातील हा एकमेव प्रदेश जो निसर्ग समृद्ध आहे. बत्तीस शिराळ्यापासून जवळच चांदोली अभयारण्य, चांदोली धरणआहेत. जेव्हापूर्वी नागपंचमीचा हा उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा तेव्हा नागपंचमीच्या एक महिना अगोदर येथील नागमंडळे नाग पकडायच्या मोहिमेला निघत. हातात लांबकाठी आणि नागाला ठेवण्यासाठी मडके असा लवाजमा घेऊन ५-६ तरुणांचा ग्रुप मोहीम फत्ते करत असे. पकडलेल्या नाग, साप, यांची नागपंचमी उत्सव संपे पर्यंत योग्यप्रकारे काळजी घेतली जाई.

नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून साधारणपणे १००-१२५ नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जाई. त्यानंतर नागाचे खेळ आयोजित होत. सर्वात उंच फणा काढणारा नाग, सर्वात लांब नाग अशा पकडलेल्या मंडळांना बक्षिसे मिळत. नागपंचमीस नागाचे खेळ पाहण्यासाठी हजारो नागरिक येत. यांतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे २ वर्षाच्या बालकापासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत सर्वजण न घाबरता गळ्यात नाग/धामण घालून फोटो काढत.

शिराळ्याची नागपंचमी पूर्वी देशातच नव्हे तर परदेशांत ही प्रसिद्ध होती. नागपंचमीसाठी पूर्वी लाख भर लोक जमायचे. परंतु, सापांचे होणारे हाल पाहून येथील निसर्ग व वन्यजीव प्रेमींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतली. कोर्टाने वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार २००२ मध्ये आदेश देऊन सापांना पकडणे, त्यांचा खेळकरणे तसेच मिरवणूक काढणे, प्रदर्शन करणे, त्यांच्या स्पर्धा भरवणे यांना बंदी केली. तसेच या आदेशाचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासन, जिल्हाकोर्ट, वन खाते आणि पोलिसांवर सोपविली. त्यामुळे रस्तो रस्ती सापांचे खेळ दाखविणे बंद करण्यात आहे नाहीतर नागपंचमीच्या आठवडयापासुन हे खेळ मोठमोठया शहरात बिनादिक्कत सुरु राहायचे. त्यामुळे काही वर्षांपासून बत्तीस शिराळ्यात फक्त प्रतिकात्मक मिरवणूक काढली जाते. आजचे नागपंचमीचे व्रत नाग प्रदेशातील एका तरी व्यक्तीशी संपर्क निर्माण करून करता येईल. दात काढलेल्या आणि उपाशी ठेवून टोपलीतून आणलेल्या नागांचा छळ थांबविणे.

नाग, सापांची उपयुक्तता घरोघरी, शाळा, महाविद्यालये यांच्या मध्ये जाऊन सांगितली पाहिजे. नागांमुळे उंदरांच्या संख्येवर नियंत्रण राहते. हरितक्रांतीची मनीषा पूर्ण व्हायची तर उंदरांच्या पोटात जाणारे धान्य वाचवावे लागेल. प्रत्येक तीन पोत्या पैकी एक पोते उंदीर खातात. म्हणूनच नागपंचमीचे आधुनिक व्रत धामण पाळा नी धान्योत्पादन वाढवा अशा उद्घोषणा बरोबरच ते कृतीतूनही व्हायला हवे. तरारून आलेल्या शेताकडे पाहून कृषी कन्यांना खूप आनंद होतो. मग त्या भविष्याची सुख- स्वप्ने पाहात उंच उंच झोके घेतात व हा सण साजरा करतात. या काळात मुलांनी मैदानी खेळ खेळावे, अशी जुनी प्रथाआहे. त्यासाठी मैदानी खेळांच्या स्पर्धा भरविण्याचा संकल्प श्रावणात धरावा व चातुर्मासात पूर्ण करावा. नागपंथाचा इतिहास आणि त्यासंबंधी विविध कलांची माहिती घेणे.

राजस्थान येथे नागपंचमी उत्साहाने साजरी केली जाते. गुजरात प्रांतात ही नागपंचमी साजरी केली जाते. नागपूजनाची परंपरा भारताच्या केरळ, तामिळनाडू या राज्यात ही आढळते. जी आजही अव्याहत सुरु असते. देशात इतरत्र ठिकाणी असलेले नागलोक हा सण दिमाखदार सोहळा म्हणूनही साजरा करतात. प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत नाग नृत्याचा प्रचार असलेला दिसून येतो. या नृत्याचा संबंध सर्जन शक्तीशी मानला जातो. नागाचा आणि पृथ्वीचा एकमेकांशी असलेला पवित्र संबंध या संस्कृतींनी मान्य केला आहे.

- प्रविण बागडे
नागपूर - १४
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravin bagdegmail. com

वीट-दगडांशिवाय बनणार स्वस्त आणि टिकाऊ घर! पूर्ण झाले देशातील पहिले पोस्ट ऑफिस

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बेंगळुरूमध्ये थ्रीडी प्रिंटिंगने बनलेल्या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन केले. थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाने बनवलेले हे देशातील पहिले पोस्ट ऑफिस आहे. बेंगळुरूच्या केंब्रिज लेआऊटजवळील उलसूर मार्केटमध्ये ते बनवण्यात आले आहे. हे बांधकाम ज्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्यात आले आहे, ते अनेक अर्थांनी विशेष आहे. साधारणपणे १००० स्क्वेअर फूटमध्ये घर बांधण्यासाठी सुमारे १२ महिने लागतात, परंतु नवीन पोस्ट ऑफिस अवघ्या ४४ दिवसांत बांधले गेले.

अशा परिस्थितीत ते थ्रीडी प्रिंटिंग तंत्र काय आहे, पोस्ट ऑफिस किती वेगळ्या पद्धतीने तयार केले गेले आहे, सामान्य बांधकामांच्या तुलनेत ते किती स्वस्त आणि टिकाऊ आहे आणि अशी बांधकामे देशात कुठे आणि कुठे झाली आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

3D प्रिंटिंग तंत्रज्ञान म्हणजे काय?

थ्रीडी प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचे नाव ऐकल्यावर, बहुतेक लोकांना समजते की त्याचा प्रिंटरशी संबंध आहे, परंतु असे पूर्णपणे नाही. या तंत्रात रोबोटिक्सच्या माध्यमातून लेयर बाय लेयर भिंत, छप्पर आणि जमीन तयार केली जाते. जर तुम्हाला सोप्या भाषेत समजायचे झाले तर, मशीनला ज्या प्रकारच्या बांधकाम आणि डिझाइनच्या सूचना दिल्या जातात, त्याच पद्धतीने ते स्वयंचलितपणे तयार करते. हे यंत्र घर तयार करण्यासाठी अनेक प्रकारे मदत करते.

साधारणपणे, बांधकाम तयार करताना वीट वापरली जाते, परंतु थ्रीडी प्रिंटिंगद्वारे तयार केलेल्या बांधकामात, एकतर ती ब्लॉक वापरली जाते किंवा ती नसते. या तंत्राने कमी वेळेत बांधकाम पूर्ण करता येईल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. साधारणपणे, वीट आणि इतर बांधकामांद्वारे तयार केलेल्या इमारतीच्या तुलनेत या तंत्राद्वारे ते लवकर पूर्ण केले जाऊ शकते.

अशा प्रकारे थ्रीडी प्रिंटिंगने बांधले गेले पोस्ट ऑफिस

तंत्रज्ञान कसे कार्य करते?

साधारणपणे घर किंवा बांधकाम तयार करताना नकाशाचा अवलंब केला जातो आणि तो लक्षात घेऊन काम केले जाते. थ्रीडी प्रिंटिंगच्या बाबतीत असे होत नाही. यामध्ये सर्व काही संगणकीकृत आहे. जो नकाशा संगणकात टाकला जातो, तो रोबोटिक्सच्या मदतीने आपोआप तयार होतो. भिंतीची रुंदी किती हवी, उंची किती असेल आणि आतील भागात कुठे आणि काय बांधायचे हे रोबोटिक यंत्रणा ठरवते.

थ्रीडी प्रिंटर अनेक प्रकारच्या मशिन्सला जोडून बनवले जाते. जसे की मिक्सर, पंपिंग युनिट, मोशन असेंबली, ऑपरेटिंग सॉफ्टवेअर, नोजल आणि फीडिंग सिस्टम. त्याची नोजल हा सर्वात महत्वाचा भाग आहे, जो बांधकामासाठी काम करतो. प्रिंटरच्या सहाय्यानेच बांधकाम साहित्य बाहेर येत राहते आणि इमारत तयार होत राहते.

कसे केले जाते बांधकाम ते व्हिडिओवरून समजून घ्या बांधकाम किती स्वस्त आणि मजबूत आहे?

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानामुळे भारतात मोठा बदल होऊ शकतो. भविष्यात त्याच्या मदतीने कमी खर्चात घरे बांधता येतील. फर्स्टपोस्टच्या रिपोर्टमध्ये, 3D प्रिंटिंग कंपनी Nexa3D चे उएज आणि चेअरमन अवि म्हणतात की, जर या तंत्रज्ञानाने घर बांधले गेले, तर त्याचे बरेच फायदे आहेत. सामान्य बांधकामाच्या तुलनेत ते कमी वेळेत तयार होते. कमी खर्च येतो आणि अधिक मजबूत होतो.

या तंत्रज्ञानाने देशात काय-काय तयार केले आहे?

आत्तापर्यंत या तंत्राने देशात अनेक बांधकामे झाली आहेत. आयआयटी मद्रासने गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये या तंत्रज्ञानासह घर बांधले होते. यानंतर देशात अनेक बांधकामे झाली.

3D प्रिंटिंगसह बनवलेले देशातील पहिले घर

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये IIT गुवाहाटीने भारतीय लष्कराच्या सैनिकांसाठी ३-डी प्रिंटेड मॉड्यूलर कॉंक्रीट पोस्ट तयार केली होती.

जेलर हा ठरणार का रजनीकांतच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा चित्रपट? फक्त एवढेच अंतर बाकी

साऊथचे सुपरस्टार रजनीकांत यांचा 'जेलर' चित्रपट प्रदर्शित होऊन १० दिवस पूर्ण झाले आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली आहे. या चित्रपटाने अवघ्या १० दिवसांत ५०० कोटींचा टप्पा पार केला आहे. यासोबत हा चित्रपट ५०० कोटींहून अधिक कमाई करणारा रजनीकांतचा दुसरा चित्रपट ठरला आहे. चाहत्यांना हा चित्रपट खूप आवडला आहे. रजनीकांतच्या ४ दशकांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठ्या चित्रपटाबद्दल बोलायचे तर, अक्षय कुमारसोबतच्या २.० या चित्रपटाने ८०० कोटींची कमाई केली होती. आता जेलर हा विक्रम पार करण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

दरम्यान रजनीकांत यांची फॅन फॉलोइंग जगभरात आहे. अशा परिस्थितीत त्यांचा कोणताही चित्रपट प्रदर्शित झाला की तो मोठ्या प्रमाणावर प्रदर्शित होतो. या चित्रपटातही तेच पाहायला मिळत आहे. रजनीकांत या चित्रपटासाठी खूप सक्रिय दिसत आहेत. त्यांनी यूपीमध्ये चित्रपटाचे स्क्रिनिंग ठेवले. त्यांनी योगी आदित्यनाथ यांचीही भेट घेतली. सनी देओलचा गदर २ आणि अक्षय कुमारचा ओएमजी २ अशा वेळी त्याचा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. मात्र त्यानंतरही या चित्रपटाने झटपट ५०० कोटींचा टप्पा पार केला.

जगभरात चित्रपटाची ज्या प्रकारे कमाई होत आहे, त्यावरून हा चित्रपट आता थांबणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. चित्रपटाने रिलीजच्या १०व्या दिवशी देशभरात १८ कोटींची कमाई केली आहे. यात परदेशातील आकडे नाहीत. म्हणजे रिलीजच्या १० दिवसांनंतरही जर चित्रपटाने

भारतातच १८-२० कोटींची कमाई केली, तर हा चित्रपट लंबी रेस का घोडा आहे, असा अंदाज लावता येईल. अशा स्थितीत चित्रपटाने याच गतीने कमाई करत राहिल्यास हा विषय होऊ शकतो.

तसे, या चित्रपटासह दोन मोठे चित्रपट यापूर्वीच प्रदर्शित झाले आहेत. पुढच्या आठवड्यातही चित्रपट येणार आहेत. अशा स्थितीत जेलरला येत्या ५ दिवसांत आपली कमाई आणखी वाढवण्याची चांगली संधी आहे. यानंतर वीकेंडमध्ये जर चित्रपटाने काही करिष्मा दाखवला, तर तो २.० चा रेकॉर्ड तोडण्यात यशस्वी होऊ शकतो. यानंतर चित्रपटाला रक्षाबंधनाच्या सुट्टीचा लाभही मिळू शकतो. त्याची वेगळीच क्रेझ दक्षिणेत पाहायला मिळत आहे.

तूर्तास, हे सत्य देखील नाकारता येणार नाही की ३०० कोटी रुपये कमी नाहीत आणि ही रक्कम जेलरला जमवावी लागेल. तरच रजनीकांतचा हा चित्रपट त्यांचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरू शकतो. आता हे घडते की नाही हे पाहायचे आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

आरोग्य

डासांना घालवण्यासाठी हे घरगुती उपाय अवलंबवा

वातावरण तापले की घरांमध्ये डासांची संख्या वाढू लागते. अशा स्थितीत बाजारात मिळणारी रसायने, फवारणी, रिफिलही काम करत नाहीत. तुम्हालाही त्रास होत असेल तर हे उपाय करून तुम्ही डासांपासून सुटका मिळवू शकता.चला तर मग जाणून घेऊ या.

कापूर- खोलीत कापूर जाळून १० मिनिटांसाठी खिडक्या आणि दरवाजे बंद करा. सर्व डास पळून

जातील.

लसूण- लसणाचा तीव्र वास डासांना दूर ठेवतो. लसणाचा रस अंगावर लावावा किंवा घरात फवारणी करा डास घरातून बाहेर पळतील.

लॅव्हेंडर- हे केवळ सुगंधीच नाही तर डासांना दूर करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. या फुलाचा सुगंध गुणकारी असून त्यामुळे डास पळून जातात. हा घरगुती उपाय वापरण्यासाठी, नैसर्गिक फ्रेशनर म्हणून खोलीत लैव्हेंडर तेल शिंपडा.

ओवा आणि मोहरीचे तेल- मोहरीच्या तेलात ओव्याची पूड मिसळा आणि त्यात पुठ्ठ्याचे तुकडे भिजवा आणि खोलीत उंचीवर ठेवा. डास जवळही येणार नाहीत.

लिंबू आणि निलगिरी तेल- जेव्हा डासांपासून बचाव करणाऱ्या रिफिलमधील द्रव संपेल तेव्हा त्यात लिंबाचा रस आणि निलगिरीचे तेल भरा. हे हात आणि पायांवर देखील लागू केले जाऊ शकते.

कडुलिंबाचे तेल - डासांच्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी हात आणि पायांना कडुलिंबाचे तेल लावा किंवा खोबरेल तेलात कडुनिंबाचे तेल मिसळून दिवा लावा.

पुदिनाचा रस - पुदिन्याच्या पानांचा रस शिंपडल्याने डास पळतात.हे शरीरावर देखील लागू केले जाऊ शकते.

तुळशीचा रस लावा- तुळशीच्या पानांचा रस अंगावर लावल्याने डास चावत नाहीत. घरात लावलेल्या तुळशीच्या रोपामुळे डास दूर राहतात.

ओव्हरथिंकिंग: तुमच्या डोक्यात सतत विचार सुरू असतील तर हे नक्की वाचा

संजूची आई त्रस्त होती त्याचं कारण एकच संजूचा सतत विचार करण्याचा स्वभाव. अरे तुझं लग्न तरी कसं व्हायचं? आणि बायको तरी कशी राहणार तुझ्या बरोबर? असं त्राग्यानं म्हटलं के संजू नेहमीप्रमाणे तंद्रीतून बाहेर येऊन म्हणत असे आं? मला काही म्हणालीस?

बाकी सगळं बरं आहे रे, तुझं ते एक ओव्हरथिंकिंग संपायला हवं! संजूच्या आईने सुस्कारा सोडला.

शेवटी संजू करत असलेले तथाकथित ओव्हरथिंकिंग योग्य की अयोग्य याचा निर्णय मानसोपचारतज्ज्ञाकडे सोपवला तेव्हा त्यांचं उत्तर मिळालं.

सुनीताची गोष्ट वेगळी कंटाळा आला विचार करण्याचा! तेच- तेच विचार आणि प्रश्नांनी मी हैराण झाले आहे. मला सगळे म्हणतात कशाला इतका विचार करतेस. ते करून काय उपयोग? मीही तेच म्हणते ना! या विचारांनी मी खूप नकारात्मक होते. माझे विचार नुसते विचार नाहीत ते नकारात्मक असतात.

प्रसादची समस्या आणखीनच वेगळी. त्याच्या मनात फक्त नकारात्मक विचार असतात असं नाही. ते विचार बहुतेकवेळा आपले हात घाण झाले आहेत असा विचार त्याच्या डोक्यात यायचा आणि तो आपल्या हातांकडे पाहत बसायचा.

त्या हाताला मागे कधीतरी एकदा घाण लागलेली होती पण तेव्हापासून त्याला वाटत असे की हे या हाताला लागलेली घाण त्याच्या पोटात जाईल मग पोट बिघडेल, पोट दुखू लागेल.

अशा विचारांची लिंक लागायची आणि प्रसाद हात धुवून टाकत असे. दोन्ही बाजूला साबण लावून पुन्हा पुन्हा हात धुतले की त्याला ठीक वाटायचं. म्हणजे त्याला ओव्हरथिंकिंगची सवय होती, असं नाही तर हात धुण्याचा मंत्रचळ लागला होता.

यावर काही उपाय असू शकतो का? प्रसादला ते ऐकून धक्का बसला.

इथे थोडक्यात तीन केस स्टोरी पहिल्या. त्याच विश्लेषण करून ओव्हरथिंकिंगचं रहस्य समजून घेऊ.

संजूचं स्वतःच्या ओव्हरथिंकिंगबद्दल असलेलं मत अगदी योग्य होतं. तो आपल्या मनात एखाद्या महत्त्वाच्या विषयातील प्रश्नावर विचार करीत असे.

नेहमीच्या गप्पा-टप्पा आणि गॉसिपमध्ये इंटरेस्ट नसायचा. या प्रकारच्या विचार प्रक्रियेला आपण सर्जनशील म्हणू. अर्थात त्याचा प्रश्न ही जातील समस्या असायला हवी. नेहमीच्या उत्तरापेक्षा वेगळा उपाय हवा असणं गरजेचं आहे.

संजू त्या विचारांबरोबर खूप टिप्पणी करत असे. अनेक प्रकारच्या आकृती असत, सुचलेल्या उत्तरांची यादी असायची. या सगळ्या गोष्टीवरून त्याच्या ओव्हरीथिंकिंगचं निदान करता आलं. अर्थात आपल्या अशाप्रकारच्या कार्यपद्धतीची संजूनं त्याच्या भावी पत्नीला माहिती करून देणं, नितांत महत्वाचं आहे.

तिनेही त्याला त्या सवयीसकट स्वीकारायला हवं. संजूनेही कटाक्षानं काही काळ कुटुंबाकरता जोडीदाराकरता राखून ठेवायला हवा. त्या वेळात त्यानं मनातला विचारांचा संगणक बंद करायला हवा. सुनीताची गोष्टच वेगळी.

तिच्या ओव्हरीथिंकिंगला रुमिनेशन अथवा रवंथ असं म्हणतात. ज्याप्रमाणे गाईगुरं रवंथ करीत कडबा चघळत असतात. तसंच सुनीता करत असे. अर्थात जनावरं रवंथ करून अन्नपचन सोपं करीत असतात. सुनीता मात्र त्या रवंथ करण्याच्या प्रक्रियेमधून काही साध्य करत नसे.

तिचं मन रवंथ करता करता काळाच्या पुढे धावत असे म्हणजे पुढे काय काय वाईट बघू शकेल यावर विचार करून भयभीत होत असे. सुनीता याच भीतीला नकारात्मक विचार म्हणत असे. सुनीता रवंथ करता करता भविष्यकाळात अडकत असे असं नाही. ती भूतकाळातल्या जुन्या चुकांवर विचार करीत असे.

थोडक्यात सुनीता वर्तमान काळातून निसटून जात असे. वर्तमान नसल्यानं ती भयग्रस्ततेच्या मनोवस्थेत हरवून जात असे.

अशा ओव्हरथिंकिंगमधून ही स्वतःची सुटका करून घेता येते. पण त्यासाठी तिला स्वतःहून प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नांशी

बांधिलकी मानली पाहिजे.

प्रसादचं ओव्हरथिंकिंग विशेष करून विकारात्मक होतं. या सवयीला मंत्रचळ अथवा ऑब्सेसिव्ह कम्पल्सिव्ह डिसॉर्डर/ ओसीडी असं म्हणतात. या विकारात मनात चुकीचे समाज ठामपणे रुजतात, मनात लुडबूड करतात. त्याची तीव्रता वाढत जाते. चिंताग्रस्तता अधिक भीषण होते आणि काहीतरी 'क्शन' घेऊन मनातल्या भीतीचं निवारण करावं लागत असे. थोडक्यात तो मनातल्या चुकीचे विचार

चिंता आणि विशिष्ट सवय (हात धुणे, नमस्कार करणे, मोजणे, खात्री करण्यासाठी पुन्हा पुन्हा चेक करणे) यांचा तो गुलाम झाला होता.

या तिघांप्रमाणे अजूनही एक प्रकार आहे. तो विशेष करून सर्वसामान्यपणे आढळतो. त्याला विकार म्हटलं जात नाही पण त्या मानसिक सवयीने खूप वेळ वाया जातो.

याला 'प्रोक्रॅस्टिनेशन' असं म्हणतात. साधारणपणे निर्णय घेण्यात दिरंगाई, कामात चेंगटपणा, दीर्घसूत्रीपणा असंही म्हणतात. हो की नाही, आता की मग, असं की तसं, हे योग्य ते ते आयोग्य याविषयी मनाचा ठाम निर्णय होत नाही.

एका नाण्याला दोन बाजू असतात पण एकेवेळी एकच बाजू दिसते. तर या मंडळीला एकाचवेळी दोन्ही बाजू दिसतात आणि त्यांना काय करायचं ते सुचत नाही. हा देखील ओव्हरथिंकींग प्रकार असला तरी त्याला 'प्रोक्रॅस्टिनेशन' असं म्हणतात.

या प्रकारावर उपाय आहेत का? आहेत नक्कीच आहेत पण त्यासाठी त्या त्या व्यक्तीने कसून प्रयत्न करावे लागतात. या सवयी आपोआप सुटत नाहीत.

त्यासाठी मनोनिग्रह, प्रामाणिक प्रयत्न आणि इच्छाशक्तीचा कसून वापर करावा लागतो. इथे त्याविषयी काही सूचना देत आहे. परंतु त्यापूर्वी अत्यंत महत्वाचा मुद्दा.

'ओसीडी'वर अर्थातच औषधोपचार करता येतात. मेंदूमधील 'सिरोटोनिन' नामक द्रव्याला अनुलक्षून औषध वापरता येतात. पण फक्त औषध घेऊन पुरेसं होत नाही त्यालाही प्रयत्नांची जोड द्यावी लागते. योग्यप्रकारे बुद्धिनिष्ठ, तर्कशुद्ध विचारसरणी शिकावी लागते.

काही सूचना

ज्याक्षणी आपण रवंथ करीत आहोत हे लक्षात येतं त्याचवेळी ताबडतोब थांबलं पाहिजे. म्हणजे 'पॉज' घेतला पाहिजे.

पुढच्याच क्षणी तेच विचार मनात आले तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं पाहिजे.

विचार करताना ज्याठिकाणी आपण वावरत बसलेले असतो तिथून काही क्षणांकरता उठून प्रत्यक्ष उठून दूर गेलं पाहिजे.

मनात उद्भवणाऱ्या चिंतेला दूर करण्यासाठी दीर्घश्वसन आणि त्यापाठोपाठ दीर्घउच्छवास सोडायला हवा. अशाप्रकारच्या दीर्घउच्छवासामुळे मनातली चिंता विरून जाते.

आपल्या श्वसनावर लक्ष केंद्रित केल्यानं मनाची भूतकाळ किंवा भविष्यकाळ याकडे धाव घेण्याची सवय आपोआप कमी होते. लक्षात ठेवायचं की भरकटणारं मन अशांत आणि दुःखी असते.

अचूक निर्णय, परफेक्ट विचार असं काहीही नसतं. त्यामुळे तातडीने आणि सणकीत निर्णय घ्या असं नाही तर ठराविक वेळात निर्णय घ्या.

विचार करता येणं ही मानवी वंशाला मिळालेली सर्वात मोठी शक्ती आहे, क्षमता आहे, हे विसरू नका.

कोणताही जुना आजार बरा करण्यास होते मदत

डाएटिंग म्हणजे खाण्यापिण्यावर सर्व प्रकारची बंधने असतात असे सामान्यत: लोक मानतात, पण या अर्थाने डाएटिंग घेणे चुकीचे आहे. शरीराच्या गरजेनुसार अन्न संतुलित प्रमाणात खाणे हाच डाएटिंगचा खरा अर्थ आहे. तसे आजकाल नवीन फॉर्म्युला १६:८ फास्टिंग प्लॅन चा ट्रेंड डायटिंगमध्ये खूप वाढला आहे आणि वजन कमी करण्यासाठी हे फॉर्म्युला देखील खूप प्रभावी मानले जाते.

इंटरमिटंट फास्टिंग (IF) हा सध्या जगातील सर्वात सामान्य आरोग्य आणि फिटनेस ट्रेंडपैकी एक आहे. लोक वजन कमी करण्यासाठी, त्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांची जीवनशैली सुलभ करण्यासाठी याचा वापर करतात. ही एक खाण्याची पद्धत आहे ज्यामध्ये तुम्ही खाणे आणि उपवासाच्या कालावधी दरम्यान पर्यायी आहात. हे काय खावे याबद्दल काहीही सांगत नाही, परंतु आपण ते कधी खावे हे सांगतात. उपवासाच्या अनेक पद्धती आहेत, त्या सर्व दिवस किंवा आठवडा खाण्याच्या कालावधीत आणि उपवासाच्या कालावधीत विभागतात.

भूक ही सहसा इतकी मोठी समस्या नसते, जरी सुरुवातीला ही समस्या असू शकते, कारण तुमच्या शरीराला दीर्घकाळ न खाण्याची सवय होते. उपवास दरम्यान अन्नाला परवानगी नाही, परंतु तुम्ही पाणी, कॉफी, चहा आणि इतर नॉन-कॅलरी पेये पिऊ शकता. उपवासाचे काही प्रकार उपवासाच्या कालावधीत कमी-कॅलरीयुक्त अन्न खाण्यास परवानगी देतात. सप्लिमेंट्स सामान्यतः उपवासाच्या वेळी अनुमत असतात जोपर्यंत ते कॅलरी-मुक्त असतात.

१६ तास उपवास करणे, दिवसाचे ८ तास सेवन करणे. लोक हे प्रामुख्याने त्यांच्या अन्न सेवनातून नाश्ता किंवा रात्रीचे जेवण काढून टाकतात. सकाळी १० च्या सुमारास खाणे सुरू करा आणि ६ च्या सुमारास खाणे थांबवा. या प्रकारच्या उपवासामुळे हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि वजन नियंत्रित करण्यास मदत होते.

या उपवासाच्या योजनेमुळे शरीराचे सर्केडियन घड्याळही व्यवस्थित काम करते, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. या योजनेंतर्गत संध्याकाळी ६ नंतर अन्न खाल्ले जात नाही, तर ८ तासांच्या कालावधीत सर्व प्रकारचे अन्न खाल्ले जाऊ शकते आणि त्यात कोणतेही बंधन नाही. तथापि, या ८ तासांच्या कालावधीत, एखाद्याने चरबीयुक्त अन्न आणि जंक फूड जास्त खाणे टाळले पाहिजे.

८ तासांच्या आहारात या गोष्टींचे सेवन करा

- फळे आणि भाज्या, संपूर्ण धान्य जसे की क्विनोआ, ब्राऊन राईस, ओट्स आणि बार्ली यांचा समावेश आहे.

पोल्ट्री, मासे, बीन्स, मसूर, टोफू, नट, बिया, कमी चरबीयुक्त कॉटेज चीज आणि अंडी यासारखे प्रथिने स्रोत

. फॅटी मासे, ऑलिव्ह, ऑलिव्ह ऑइल, नारळ, एवोकॅडो, नट आणि बिया यापासून निरोगी चरबी

. संपूर्ण धान्यांमध्ये उच्च फायबर असते, म्हणून ते भूक दडपतात. निरोगी चरबी आणि प्रथिने देखील खाणे आवश्यक आहे.

दिवसभरात किमान ३ ते ४ लिटर पाणी पिणे आवश्यक आहे.

हर्बल दालचिनीचा चहा देखील दिवसातून एकदा पिऊ शकतो, ज्यामुळे भूक कमी होते.

फायदा : अधूनमधून उपवास करण्यावर प्राणी आणि मानव दोघांमध्ये अनेक अभ्यास झाले आहेत. या अभ्यासातून असे दिसून आले आहे की वजन व्यवस्थापन आणि तुमच्या शरीर आणि मनाच्या आरोग्यासाठी याचे शक्तिशाली फायदे होऊ शकतात. हे तुम्हाला अधिक काळ जगण्यासाठी देखील प्रेरित करू शकते. येथे मुख्य आरोग्य फायदे आहेत-

वजन कमी करणे: वर नमूद केल्याप्रमाणे, हे तुम्हाला तुमच्या कॅलरीज सक्रियपणे कमी न करता वजन आणि पोटाची चरबी कमी करण्यास मदत करेल.

इन्सुलिन प्रतिरोध: उपवासामुळे इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता कमी होते, रक्तातील साखर ३% ते ६% कमी होते आणि इंसुलिनची पातळी २०% ते ३१% कमी होते, ज्याने टाइप २ मधुमेहापासून संरक्षण होते.

जळजळ: काही अभ्यासांमध्ये दाहक चिन्हकांमध्ये घट दिसून येते, जे अनेक जुनाट आजारांमध्ये गुंतलेले असतात.

हृदय: ते खराब एलडीएल कोलेस्टेरॉल, रक्त ट्रायग्लिसरायड्स, दाहक मार्कर, रक्तातील साखर आणि इंसुलिन प्रतिरोधकता कमी करू शकते.

कर्करोग: काही अभ्यासांनी दर्शविले आहे की पर्यायी- अधूनमधून उपवास केल्याने लिम्फोमाची वाढ मंदावून, ट्यूमरचे अस्तित्व मर्यादित करून आणि कर्करोगाच्या पेशींचा प्रसार कमी करून कर्करोगाचा धोका कमी होऊ शकतो.

मेंदूचे आरोग्य: उपवासामुळे बीडीएनएफ हार्मोन वाढते. मेंदू आणि नवीन तंत्रिका पेशींचे उत्पादन वाढवते. विकासास मदत करू शकते. हे अल्झायमर रोगापासून देखील संरक्षण करू शकते.

अँटी-एजिंग: उपवास केल्याने उंदरांचे वृद्धत्व वाढू शकते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की उपवास केलेले उंदीर ३६% ते ८३% जास्त जगतात.

मायक्रोवेव्हमध्ये या ५ गोष्टी कधीही पुन्हा गरम करू नका

आजच्या काळात आपल्या जीवनशैलीत खूप बदल झाले आहेत. आजकाल घरात किंवा ऑफिसमध्ये अन्न शिजवण्यासाठी किंवा गरम करण्यासाठी मायक्रोवेव्ह असतात. मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करणे खूप सोपे आहे. तुमचा ग्लास किंवा प्लास्टिक टिफिन मायक्रोवेव्हमध्ये ठेवून तुम्ही अन्न सहज गरम करू शकता. पण तुम्हाला माहिती आहे का की मायक्रोवेव्हमध्ये काही गोष्टी गरम करणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. वास्तविक, मायक्रोवेव्हमध्ये या गोष्टी पुन्हा गरम केल्याने अन्न बदलते, ज्यामुळे तुम्हाला गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. जाणून घेऊया या पदार्थांबद्दल...

१. भात : भात मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नये. भात पुन्हा गरम केल्याने अन्नातून विषबाधा होऊ शकते. वास्तविक, भातामध्ये बॅसिलस सिरियस नावाचा जीवाणू असतो. तांदूळ पुन्हा गरम केल्याने त्याचे प्रमाण वाढते. उष्णतेमुळे जीवाणू नष्ट होतात परंतु त्यामुळे बीजाणू निर्माण होतात जे विषासारखे असतात. बॅक्टेरियामुळे तुम्हाला जुलाब, उलट्या किंवा पोटदुखी सारख्या समस्या होऊ शकतात.

२. उकडलेले अंडे:

उकडलेले अंडे कधीही मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नये. मायक्रोवेव्हमध्ये अंडे गरम केल्याने ते प्रेशर कुकरसारखे गरम होते, ज्यामुळे अंड्याचा स्फोट होऊ शकतो. मायक्रोवेव्हमध्ये अंड्याचा स्फोट होत नसल्यास, ते तुमच्या प्लेट किंवा हातावर स्फोट होऊ शकते. त्यामुळे मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नका.

३. पालेभाज्या: तुम्ही पालक किंवा ब्रोकोली सारख्या भाज्या मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नयेत. एका अभ्यासानुसार, पालेभाज्या किंवा हिरव्या भाज्या मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम केल्याने त्यातील ९७% पोषक घटक नष्ट होतात. म्हणूनच तुम्ही ते मायक्रोवेव्हमध्ये गरम करू नये.

४. कॉफी: बरेच लोक ऑफिसमध्ये किंवा घरात मायक्रोवेव्हमध्ये कॉफी पुन्हा गरम करतात. मायक्रोवेव्हमध्ये कॉफी पुन्हा गरम करणे ही चांगली कल्पना नाही. पुन्हा गरम केल्यावर त्याची चव कमी होते आणि सुगंधही कमी होतो. एक प्रकारे, कॉफी पुन्हा गरम केल्याने ती खराब होते.

५. चिकन: मायक्रोवेव्हमध्ये चिकन पुन्हा गरम केल्याने साल्मोनेला दूषित होण्याचा धोका वाढतो. चिकन खाण्यापूर्वी, आपण ते चांगले शिजवावे जेणेकरून त्यातील सर्व जीवाणू नष्ट होतील. मायक्रोवेव्हमध्ये मांसाचे सर्व भाग पूर्णपणे शिजवले जात नाहीत त्यामुळे सॅल्मोनेलासारखे जिवंत जीवाणू जिवंत राहण्याची शक्यता जास्त असते.

पोस्ट-कोविड नंतर फुफ्फुसांच्या फायब्रोसिसची समस्या

कोविड महामारीच्या संसर्गातून बरे होत असताना, काहींना दीर्घकालीन गुंतागुंत झाली. त्यातील एक गुंतागुंत म्हणजे पोस्ट-कोविड फुफ्फुसातील फायब्रोसिस, फुफ्फुसाच्या ऊतींना डाग पडणे तसेच नुकसान झाल्याचे दिसून आले. कोविड हा थेट फुफ्फुसांवर हल्ला करणारा विषाणू आहे. यामुळे फुफ्फुसाच्या कार्यावर परिणाम होतो. फुफ्फुसांची हवा वाहून नेण्याची क्षमता कमी होते ज्यामुळे हवेच्या वेंटिलेशनवर परिणाम होतो. कोविडने बाधित झालेल्या ४०% पेक्षा जास्त रुग्णांना फुफ्फुसाच्या फायब्रोसिसचा त्रास आहे.

पोस्ट-कोविड फुफ्फुसातील फायब्रोसिस समजून घेताना

ड-ठड-उेत-२ विषाणूमुळे श्वसन प्रणालीला गंभीर नुकसान होते तेव्हा पोस्ट-कोविड फुफ्फुसाचा फायब्रोसिस होतो. पल्मनरी फायब्रोसिस मध्ये फुफ्फुसांमधील ऊतींना नुकसान झालेले असते आणि या घट्ट आणि कडक झालेल्या ऊतींमुळे फुफ्फुसांना योग्यरित्या कार्य करणे कठीण होत जाते. जसजसे फुफ्फुसाचा फायब्रोसिस वाढू लागतो तसतसे फुफ्फुसाकडून शरीराला जाणारे प्राणवायू अपुरे पडते आणि श्वसनाचा त्रास उद्भवतो. फायब्रोसिसच्या लक्षणांमध्ये दम लागणे, सततचा खोकला, थकवा, छातीत अस्वस्थता आणि अशक्तपणा येणे यांचा समावेश होतो. ही लक्षणे एखाद्या व्यक्तीच्या जीवनमानावर आणि दैनंदिन क्रियाकलापांवर लक्षणीय परिणाम करू शकतात.

उपचार पद्धती : कोविड नंतरच्या फुफ्फुसांच्या फायब्रोसिसवर उपचार करण्यासाठी बहु-अनुशासनात्मक दृष्टीकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये पल्मोनोलॉजिस्ट, श्वसन थेरपिस्ट आणि इतर आरोग्यसेवा व्यावसायिकांचा समावेश आहे. अनेक उपचार पद्धती लक्षणे व्यवस्थापित करण्यात मदत करू शकतात, रोगाची प्रगती कमी करू शकतात आणि फुफ्फुसाचे कार्य सुधारू शकतात.

औषधोपचार: डॉक्टर कॉर्टिकोस्टिरॉईड्स सारखी एंटीइनफ्लेमेट्री औषधे लिहून देऊ शकतात. इतर औषधे, जसे की अँटीफायब्रोटिक एजंट्स देखील वापरली जाऊ शकतात.

ऑक्सिजन थेरपी: गंभीर फुफ्फुसाचा फायब्रोसिस असलेल्या रुग्णांना रक्तप्रवाहात ऑक्सिजनची पुरेशी पातळी सुनिश्चित करण्यासाठी पूरक ऑक्सिजन थेरपीची आवश्यकता असू शकते.

पल्मनरी रिहॅबिलेशन: यात फुफ्फुसाचे कार्य आणि एकूण शारीरिक क्षमता सुधारण्यासाठी व्यायाम प्रशिक्षण, श्वासोच्छवासाचे तंत्र समाविष्ट आहे.

फुफ्फुस प्रत्यारोपण: गंभीर प्रकरणांमध्ये जेथे पुराणमतवादी उपचार अयशस्वी होतात, फुफ्फुसांचे कार्य आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी फुफ्फुस प्रत्यारोपण हा शेवटचा पर्याय मानला जाऊ शकतो.

स्टेमआरएक्स बायोसायन्स ही एक नाविन्यपूर्ण जैवतंत्रज्ञान कंपनी आहे जी रिजनरेटिव्ह औषधांच्या माध्यमातून अत्याधुनिक उपाय विकसित करते. पोस्ट-कोविड फुफ्फुसांच्या फायब्रोसिसच्या संदर्भात, स्टेमआरएक्स बायोसायन्सने संभाव्य उपचार पर्याय म्हणून

मेसेन्कायमल सेल थेरपीचा वापर केला जातो.मेसेन्कायमल सेल थेरपीमध्ये अस्थिमज्जा पेशींचे प्रशासन समाविष्ट असते, ज्यामध्ये विविध प्रकारच्या पेशींमध्ये फरक करण्याची अद्वितीय क्षमता असते, ज्यामुळे ऊती दुरुस्ती आणि पुनरुत्पादनास प्रोत्साहन मिळते. स्टेमआरएक्स बायोसायन्सने एक सेल-आधारित उत्पादन विकसित केले आहे ज्याचा उद्देश मेसेन्कायमल पेशींच्या पुनरुत्पादक क्षमतेचा वापर करून कोविड नंतरच्या फुफ्फुसांच्या फायब्रोसिसमुळे खराब झालेल्या फुफ्फुसाच्या ऊतींची दुरुस्ती करणे आहे. याबाबत सुरु असलेल्या क्लिनिकल चाचण्या आणि संशोधनावारे, स्टेमआरएक्स बायोसायन्सचे उद्दिष्ट हे कोविड-नंतरच्या फुफ्फुसातील फायब्रोसिसच्या व्यवस्थापनामध्ये

सेल-आधारित थेरपीच्या सुरक्षिततेचे आणि परिणामकारकतेचे मूल्यांकन करणे आहे. प्रारंभिक प्रेक्लीनिकल आणि क्लिनिकल डेटा आशादायक परिणाम दर्शविते, फुफ्फुसाचे कार्य आणि प्रभावित व्यक्तींच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी या अभिनव दृष्टिकोनाची क्षमता सूचित करते.

निष्कर्ष : कोविड १९ मधून बरे झालेल्या काही व्यक्तींसाठी पोस्ट-कोविड फुफ्फुसाचा फायब्रोसिसचा दीर्घकालीन परिणाम दिसून येतो. हा उपचार पर्याय लक्षणे व्यवस्थापन आणि रोगाच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करतो. स्टेमआरएक्स बायोसायन्सद्वारे ऑफर केलेल्या मेसेन्कायमल सेल थेरपीसारख्या नाविन्यपूर्ण पध्दती उपचारात फायदेशीर ठरत आहेत. याबाबत संशोधन आणि अभ्यास सुरु असताना शास्त्रज्ञ, आरोग्यसेवा व्यावसायिक आणि बायोटेक्नॉलॉजी कंपन्यांनी रिजनरेटिव्ह औषधाच्या क्षेत्रातील प्रगतीसाठी आणि पोस्ट-कोविड फुफ्फुसांच्या फायब्रोसिस मुळे त्रासलेल्या रुग्णांचे जीवन सुधारण्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे.

- डॉ प्रदिप महाजन

मेडिसिन एक्स्पर्ट, स्टेम आरएक्स बायोसायन्स सोल्युशन्स प्रा. लि.

लातूर
भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com

विशेष मतदार नोंदणी अभियान

लातूर : जिल्हा निवडणूक अधिकारी लातूर व श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष मतदान नोंदणी अभियान आयोजित करण्यात आले आहे. दिनांक २१ ते २३ ऑगस्ट २०२३ दरम्यान सुरू असलेल्या या विशेष मतदार नोंदणी अभियानात ज्यांचे नाव मतदार यादीत नाही व ज्यांचे वय १८ किंवा त्यापेक्षा अधिक आहे असे पात्र तरुण-तरुणी, मयत किंवा कायम स्थलांतरित असलेले मतदान यादीतून नाव वगळणे, मतदार यादीतील तपशील, दुरुस्ती, पत्ता बदल, मतदान ओळखपत्र हरवले असल्यास, मतदार यादीशी आधार क्रमांक जोडणी करणे इत्यादी कामे या विशेष मतदार नोंदणी अभियानात मतदारांनी करून घ्यावे. असे आवाहन आयोजित केलेल्या कार्यक्रमात नायब तहसिलदार श्री पंकज मंदाडे यांनी केले.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात सद्भावना दिवस साजरा

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२० ऑगस्ट २०२३ रोजी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्मदिवस ' सद्भावना दिवस ' म्हणून साजरा करण्यात आला.यावेळी पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील यांनी भारतरत्न राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि त्यांच्यासमवेत सर्वांनी सद्भावना दिनाची शपथ घेतली.

याप्रसंगी डॉ.महादेव पंडगे, प्रा.बळवंत सूर्यवंशी, प्रा.विजय मांदळे, प्रा.व्यंकट कैले, प्रा.संतोष निलंगे, प्रा.सतिश नागटिळक, सुदाम सातपुते, रामकृष्ण सलगर, सुनील राक्षे, पोपट बाजपाई, बालू चौगुले, बालाजी पिटले यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यांवर कोट्यवधींचे ड्रग्ज

मुंबई : महाराष्ट्राच्या पश्चिम टोकाला समुद्रकिनारी कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज सापडल्यानं खळबळ उडाली आहे. हे ड्रग्स समुद्राच्या लाटांनी तरंगणाऱ्या पॅकेट्सच्या स्वरूपात किनाऱ्यावर आढळून आले. रत्नागिरी जिल्ह्यातील सात वेगवेगळ्या किनाऱ्यांवरून सीमाशुल्क विभागानं २५० किलोहून अधिक ड्रग्सचे पॅकेट्स ताब्यात घेतले. प्रशासनाकडून आधीच निर्बंध लादण्यात आलेल्या या ड्रग्सचे प्लास्टिकच्या पिशव्यांचे पॅकेट्स १४ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या किनाऱ्यांवर वाहून आले. कर्डे, लाडघर, केळशी, कोलथरे, मुरुड, बुरुंडी, दाभोळ आणि बोर्या समुद्रकिनाऱ्यांवर ही ड्रग्सची पाकिटं जप्त करण्यात आली आहेत.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या समुद्रकिनाऱ्यांवर वाहून आलेली ड्रग्सची पाकिटं अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधून वाहून आली असावीत, असा सीमाशुल्क विभागाला संशय आहे. ही अंमली पदार्थांची पाकिटं एकतर समुद्रात पडली असतील किंवा अंमली पदार्थांच्या तस्करीच्या उद्देशानं परदेशी जहाजांमधून फेकण्यात आली असतील, असा संशयही सीमाशुल्क विभागाकडून व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सुरक्षा गस्तीदरम्यान, रत्नागिरीतील दापोली सीमाशुल्क विभागाच्या तटरक्षक दलाला कर्डे समुद्रकिनारी वाहून आलेले १० संशयास्पद पॅकेट्स (एकूण १२ किलो वजनाची) आढळून आली. तात्काळ ही ड्रग्सची पाकिटं सीमाशुल्क विभागानं ताब्यात घेतली आणि त्यांची तपासणी केली. तपासाअंती चरस असल्याचं निष्पन्न झालं. त्यानंतर केळशी ते बोर्या परिसरात सीमाशुल्क विभागाकडून शोधमोहीम राबविण्यात आली.

आशिया कप २०२३ साठी टीम इंडियाची घोषणा

नवी दिल्ली: येत्या ३० ऑगस्टपासून बहुप्रतीक्षित असा आशिया चषक २०२३ खेळवला जाणार आहे. ही स्पर्धा पाकिस्तान आणि श्रीलंका अशा दोन देशांमध्ये खेळवली जाणार आहे. पहिला सामना ३० ऑगस्ट रोजी पाकिस्तान आणि नेपाळ यांच्यात होणार आहे. टीम इंडिया आपला पहिला सामना २ सप्टेंबरला पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. टीम इंडियाचा पाकिस्तान आणि नेपाळसह अ गटात समावेश आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका ब गटात आहेत. या आशिया चषकासाठी बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार रोहित शर्मा यांनी पत्रकार परिषद घेऊन भारतीय संघाची घोषणा केली.

अपेक्षेप्रमाणे जसप्रीत बुमराहचे संघात पुनरागमन झाले आहे, तर संघाचे नेतृत्व रोहित शर्माकडे असेल. या संघात तिलक वर्माची सरप्राईज एन्ट्री झाली आहे. नवी दिल्लीत निवड समितीच्या बैठकीनंतर कर्णधार रोहित आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेत १७ सदस्यीय संघाची घोषणा केली.

रोहित शर्मा (कर्णधार), इशान किशन, शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, संजू सॅमसन (बॅकअप).

या खेळाडूंचे संघात पुनरागमन

जसप्रीत बुमराह, केएल राहुल आणि श्रेयस अय्यर दीर्घ काळानंतर टीम इंडियात परतले आहेत. तिघेही दुखापतीमुळे बराच काळ संघातून बाहेर होते. बुमराहने आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत पुनरागमन केले, तर केएल राहुल आणि श्रेयस अय्यर थेट आशिया कपमध्ये खेळताना दिसतील. केएल राहुल आणि

श्रेयस अय्यर यांच्या पुनरागमनावर सर्वांचे विशेष लक्ष होते.

माजी भारतीय क्रिकेटपटू अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली शिव सुंदर दास, सुब्रतो बॅनर्जी, सलील अंकोला आणि श्रीधरन शरथ यांचा समावेश असलेल्या समितीने संघाची निवड केली आहे. कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांनीही निवड बैठकीला हजेरी लावली.

पोलीस उपनिरीक्षक कव्हाळे यांना निरोप

लातूर : गांधी चौक पोलीस स्टेशन लातूर येथे कार्यरत असणारे पोलीस सब इन्स्पेक्टर व्यंकटराव कव्हाळे यांची प्रशासकीय कारणाने भादा ता. औसा येथे बदली झाल्याने त्यांचा पोलिस ठाण्याच्या वतीने व शहरवासीयांच्या वतीने सत्कार करून त्यांना शुक्रवारी निरोप देण्यात आला . गांधी चौक पोलीस स्टेशन येथे त्यांनी जवळपास अडीच वर्ष सेवा बजावली.

या काळामध्ये त्यांनी विविध प्रकरणे हाताळून अनेक निरपराध्यांना न्याय व गुन्हेगारांना शिक्षा देण्याचे उत्कृष्ट कार्य केले आहे. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर भागवतराव फुंदे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार वैजनाथराव शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जगदीश बावणे, पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे , सपोनि . श्रीशैल्य कोल्हे, सपोनि नौशाद पठाण, सरकारी वकील लक्ष्मणराव शिंदे आदीसह अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दामोदर मुळे, शिवा पाटील, अक्रम मोमीन, दत्ता शिंदे , दिलीप लोभे , शिवाजीराव गिरबुणे , माधव मामडगे आदिनी परिश्रम घेतले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरलीधरराव सूर्यवंशी तर आभार श्री शैल्य कोल्हे यांनी मानले.

भाजपसोबत समझोता करणार नाही सांगितल्यावर माझ्यावर छापा : अनिल देशमुख

नागपूर : भाजपकडून माझ्यावरही समझोता करण्यासाठी दबाव होता, पण मी नाही सांगितलं आणि दुसऱ्याच दिवशी माझ्यावर धाड पडली, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) अनिल देशमुख यांनी केला आहे. ते एबीपी माझाशी नागपुरात बोलत होते.

याबाबत अनिल देशमुख म्हणाले की, शरद पवारसाहेब पुण्यातील कार्यक्रमात बोलले की आमच्यातले नेते ईडीच्या भीतीने भाजपने गेले. त्यात माझ्याही नावाचा उल्लेख केला, ते खरं आहे. माझ्यावरही भाजपकडून समझोता करण्यासाठी दबाव होता. मी सरळ सांगितलं समझोता करणार नाही, त्याच्या दुसऱ्याच दिवशी माझ्यावर धाड पडली. परमबीर सिंह यांना माझ्यावर खोटे आरोप करण्यास सांगितलं आणि माझ्यावर कारवाई करण्यात आली. मी समझोता केला असता तर माझ्यावर कारवाई झाली नसती.

पुण्यातील कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसमधील बंडखोरांवर निशाणा साधताना शरद पवार म्हणाले की, अलीकडेच आमचे काही लोक सरकारमध्ये सामील झाले आहेत. आम्ही विकासाच्या मुद्द्यावर गेलो असं ते सांगत आहे. पण त्याला फारसा अर्थ नाही. त्यापैकी काही ईडीच्या चौकशीत होते. त्यातील काहींना तपासाला सामोरे जावेसं वाटलं नाही, तर अनिल देशमुख यांच्यासारख्या काहींनी तुरुंगात जाणं पसंत केलं.

अनिल देशमुख यांनी तुरुंगात जाणे स्वीकारलं आणि १४ महिने तिथे घालवले. तिथे त्यांना तपास टाळण्यासाठी भाजपमध्ये सामील होण्याची ऑफर देण्यात आली होती, परंतु आपण कोणताही गुन्हा केला नाही. मी कायद्याला सामोरा जाईन पण आपली विचारधारा सोडणार नाही, असं त्यांनी सांगितलं. तर आमच्या काही सदस्यांनी तपास यंत्रणांच्या दबावाखाली भाजपमध्ये प्रवेश केला, असं शरद पवार म्हणाले.

दरम्यान शरद पवार यांच्यावर भाष्य करणाऱ्या दिलीप वळसे पाटील यांच्यावरही अनिल देशमुख यांनी हल्लाबोल केला. ते म्हणाले की, सर्वांनाच माहित आहे की महाराष्ट्राच्या राजकारणात स्वबळावर सत्ता आणू शकत नाही. दिलीप वळसे पाटील यांनी अनेक वर्षे पवारसाहेब यांच्याबाबत काम केले, त्यांनी तारतम्य बाळगायला हवे. नाही तर त्यांच्या जिल्ह्यातील लोक त्यांना धडा शिकवतील, असं देशमुख म्हणाले.

कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क लावल्याने दर पडले. कांदा उत्पादकांचे मोठं नुकसान कापसाबाबतही असंच घडलं. कापसाची आयात झाल्याने देशात कापसाचे भाव पडले. निर्यात आणि आयात धोरणामुळे कापूस उत्पादकांचे नुकसान केलं. तेच नुकसान आता कांदा उत्पादकांचे होत आहे. हे धोरण मागे घ्यावं. हे सरकार शेतकरी समर्थक सरकार नाही, असं अनिल देशमुख म्हणाले.

रामलिंग मुदगड येथील भव्य शिवलिंग

अत्यंत पवित्र, ऐतहासिक व पौराणिक धार्मिक स्थळी श्री रामचंद्र व श्री लक्ष्मणांनी आपल्या शिवपूजनासाठी अत्यंत भव्य शिवलिंग स्थापन करून साधना केली होती.या ठिकाणी दोन गाभारे असून त्यात दोन वेगळे शिवलिंग आहेत.मंदिर दगडी व अत्यंत पूरातन आहे.

देशातील १२ ज्योर्तिलिंगा नंतर याला १३ व ज्योर्तिलिंगाचा मान गावकरी देवून मनोभावे पूजन करतात.या दिवशी अधिक श्रावण समाप्ती निमित्त आयोजित पूजा व हवनाचा लाभ मिळाला व अत्यंत स्वादिष्ट गव्हाची खीरीचा महाप्रसाद ही लाभला व आम्ही कृतार्थ जाहलो.

या ठिकाणी सदगुरू श्री सदानंद स्वामी महाराज यांच वास्तव्य असून जगातील अत्यंत दूर्मिळ रमल विद्येच्या बोटावर मोजण्याईतक्या जाणकारांपैकी ते एक आहेत.

दर आठवड्यातील शनिवार व रविवारी शेकडो भक्तगण आपले प्रश्न,व्यथा व दूख: घेवून महाराजांकडे येतात व महाराज त्यांना प्रभु रामलिंगेश्वरांच्या आर्शिवादाने दुख:मुक्त करून ,आर्शिवाद देवून पाठवितात.येथील चमत्काराची व भक्तांच्या अनुभवाची सप्रमाण खूप मोठी यादी आहे.येथील दैवीय ऊर्जेचा मी स्वत: अनुभव घेतला आहे.अत्यंत सटिक व तंतोतंत तूमचा भूतकाळ,वर्तमान व भविष्याबद्दल महाराज मार्गदर्शन करतात याचाही मी अनुभव घेतला.आजही आमच्या सनातन धर्मात ची ताकद,चमत्कार,विद्या,रिद्धी-सिद्धी चे सप्रमाण अनुभव दुर्मिळ अनुभवायला मिळतात त्या पैकी एक हे ठिकाण.मला या ठिकाणी घेवुन जाणार्या मित्रवर्यांचे खूप-खूप आभार.

-कुलदीप ठाकूर
संपर्क:-९८२२२ २७०१९

फायनान्शियल ग्लोबल इन्हान्समेंट या विषयावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयात वेबिनार संपन्न

लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय व एक्सलंट ग्लोबल स्किल रायपुर, छत्तीसगड यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय ऑनलाईन वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी साधन व्यक्ती म्हणून मीनल गाला यांनी फायनान्शिअल लिटरसी चे महत्व समजून सांगताना 'फायनान्शिअल ग्लोबल इन्हान्समेंट ' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, नॅक समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, एनआयएसएम समन्वयक डॉ. आर.एस. गिल्डा यांची प्रमुख उपस्थित होती. सूत्रसंचालन प्रा. अनुजा कांबळे यांनी केले. आभार प्रा.पंकज भराडिया यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. एल एन.सोनी, प्रा. प्रसाद पाटील यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

लातूर : केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाकडून शौर्य, सामाजिक सेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, कला व संस्कृति आणि निविन्यपूर्ण कार्य केलेल्या १८ वर्षाखालील भारतीय नागरिक असलेल्या बालकांना प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२४ देण्यात येणार आहे. यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी देवदत्त गिरी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार-२०२४ चे बाल शक्ती पुरस्कार व बाल कल्याण पुरस्कार या दोन श्रेणीमध्ये रुपांतरण करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी सार्वजनिकरित्या खुले नामनिर्देशन हे केवळ www.awards.gov.in या संकेतस्थळामार्फतच स्वीकारले जाईल. संकेतस्थळाव्यतिरिक्त प्राप्त होणारे नामनिर्देशन अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पुढील वर्षाच्या जानेवारी महिन्यात पुरस्कार देण्यासाठी प्रत्येक वर्षाच्या ३१ ऑगस्ट पर्यंत वर्षभरात केव्हाही संकेतस्थळामार्फत अर्ज स्वीकारले जातील.

विशेष नैपुण्य असणाऱ्या मुलाची शिफारस कोणत्याही नागरिकाला संकेतस्थळावर करता येईल. संकेतस्थळामार्फत विहीत मुदतीत प्राप्त होणारे अर्ज राज्य अथवा केंद्रशासित प्रदेश आणि जिल्हाधिकारी अथवा जिल्हा न्यायाधिश इतर शासन योग्य संस्था यांना पडताळणी करता पाठविण्यात येतील. केंद्र शासनाच्या पत्रामध्ये, मार्गदर्शक सूचनांमध्ये राष्ट्रीय बालक पुरस्काराचे अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ विहीत करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाने नामनिर्देशन पाठविण्याविषयी विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचना पाहता प्राथमिक स्तरावर राज्य शासनाकडून छाननी अपेक्षित नाही, असे लातूरचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लातूर यांच्या न्यायालयात

जन्म/ मृत्यू प्रमाणपत्र बाबत जाहिर नोटीस

फौ. कि. अर्ज क्र. ८४७/२०२३
(जहरा फातिमा फारूख सय्यद विरूद्ध आयुक्त)

ज्यापेक्षा जहरा फातिमा पिता फारूख सय्यद चा जन्म दिनांक १२/१२/२०१६ रोजी राहत्या घरी झाला आहे. अर्जदार तय्यबा भ्र. फारूख सय्यद यांनी ६ वे न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग लातूर या न्यायालयात सदर जहरा फातिमा पिता फारूख सय्यद यांच्या जन्माबाबत म.न.पा. लातूर ता. जि. लातूर या कार्यालयात नोंद घेवून प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज अर्जदार यांनी केला आहे. तसेच उपरोक्त अर्जदाराचे म्हणणे आहे की, वरील नमुद जहरा फातिमा पिता फारूख सय्यद जन्म दिनांक १२/१२/२०१६ रोजी झाला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे वरील नमुद तारखेस जन्म झाला नाही असे कोणास सांगायचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून **दिनांक २७/०९/२०२३** या तारखेपर्यंत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे लागलीच पुरावा घेऊन जन्माबाबतची नोंद घेण्याबाबतचा आदेश देण्यात येईल.

आज दिनांक : १९/०८/२०२३

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी
न्यायालय, लातूर

CHANGE OF NAME

Here in this advertise i am declaring that i have change my name which was earlier : **GHANTE SALEEM TAHERALI TO : GHANTE SALIM TAHERALI**

Hence for this declaration i will be known by this name and will use **GHANTE SALIM TAHERALI** In future the same name will be used by my family wife/ Children and relative.

OLD NAME :- GHANTE SALEEM TAHERALI
NEW NAME :-GHANTE SALIM TAHERALI
ADDRESS :- Bhoi Galli, latur.

CHANGE OF NAME

Here in this advertise i am declaring that i have change my name which was earlier : **VADALIA RASIKLAL JIVANBHAI TO : VADALIYA RASIKLAL JIVANBHAI**

Hence for this declaration i will be known by this name and will use **VADALIYA RASIKLAL JIVANBHAI** In future the same name will be used by my family wife/ Children and relative.

OLD NAME :- VADALIA RASIKLAL JIVANBHAI
NEW NAME :-VADALIYA RASIKLAL JIVANBHAI
ADDRESS :- Manthale Nager, Latur.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी संकुल, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरुपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक,
निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९

माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते